**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र आनंदा पवार
द्वारा-अे.के.पवार
४१/२५२, बुधवार पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर), मंडळ, येरवडा, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर), विभाग, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र आनंदा पवार
द्वारा-अे.के.पवार, ४१/२५२, बुधवार पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर), मंडळ, येरवडा, पुणे प्रतिनिधी श्री.ज.गं.संट

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर), विभाग, सोलापूर प्रतिनिधी श्री.ग.ब.निलवाणी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.१६१२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कळविलेले शुल्क जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर यांनी स्वीकारले नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'पर्यंत माहिती दिली नाही व त्यावेळी दिलेली माहितीही अपुरी दिली. त्यामुळे मनीऑर्डरने भरलेली रक्कम आपल्याला परत मिळावी व माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रविंद्र आनंदा पवार यांनी केली.

श्री.पवार हे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर यांच्या कार्यालयात शाखा अभियंता या पदावर अक्कलकोट विभागामध्ये कार्यरत होते. आता उस्मानाबाद येथे कार्यरत आहेत. अद्ययावत गोपनीय अहवाल, प्रवास देयक मंजुरीबाबत केलेला दुजाभाव आदि बाबींचा उल्लेख त्यांनी मूळ अर्जात केला नसून अपील अर्जात केला आहे. त्या त्या वेळी त्यांना सर्व माहिती देण्यात आली आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.ग.ब.निलवाणी यांनी प्रतिपादन केले. दिलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

प्रवास देयकाबाबतच्या शासन निर्णयाची प्रत आपल्याला मिळाली नसल्याची श्री.पवार यांची तक्रार असून ती त्यांना द्यावी,. तसेच शुल्क न स्वीकारण्याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर यांनी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर श्री.ने.ना.गोरे यांचे दि.१८.११.२००८ चे सविस्तर लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.ग.ब.निलवाणी यांनी आयोगाला खुलाशासह सादर केले. कळविलेले शुल्क भरण्यास श्री.पवार आले नव्हते. माहिती देण्याबाबत टाळाटाळ केली असे एकदाही घडलेले नाही. संपूर्ण माहिती उपलब्ध ठेवून, तसेच त्यांच्या नियंत्रक कार्यालयामार्फत पाठवून वेळोवेळी देण्यात आलेली आहे. आणखी माहिती आवश्यक असल्यास ती देण्याची तयारीही 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आपण दर्शविली होती. त्यावेळी आयोगाने दिलेल्या निदेशानुसार श्री.पवार यांना पुन्हा सर्व माहिती देण्यात आली. हे लक्षात घेता श्री.पवार यांचा हेतू माहिती मिळविण्यापुरताच मर्यादित आहे का याची खातरजमा करण्याची विनंती आहे, असे श्री.गोरे यांनी निवेदनात नमूद केले आहे. मात्र आयोगाच्या मौखिक आदेशानुसार आपल्याला माहिती मिळाली नाही. आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या पुराव्यातील असल्यामुळे वस्तुनिष्ठ स्वरूपात ती दिली जात नाही, अशी तक्रार श्री.पवार यांनी दि.४.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्याबाबत दि.१६.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाने जन माहिती अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविला. प्रवास भत्ताविषयक शासन निर्णय नसल्यामुळे त्याची प्रत देता येत नसल्याचे अपीलकर्त्यास सांगण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सोलापूर श्री.व्ही.आर.शिंदे यानी दि.६.३.३००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. श्री.पवार यानी प्रशासकीय कार्यवाहीविषयक केलेल्या तक्रारी व मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि, त्यांच्या अर्जानुसार मुद्देनिहाय कार्यवाहीबाबत सहाय्यक अधीक्षक

अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), सोलापूर यांना दि.२६.६.२००९ च्या पत्रान्वये कळविल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
रा.टेक्निकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१४, ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी (दंडाधिकारी),
उप विभागीय अधिकारी, सातारा यांचे कार्यालय, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी (दंडाधिकारी),
उप विभागीय अधिकारी, सातारा यांचे कार्यालय, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
रा.टेक्निकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.१४, ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी (दंडाधिकारी)
उप विभागीय अधिकारी, सातारा यांचे कार्यालय,
जि.सातारा श्री.संजय शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.०६.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०३.०८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०२.०८.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमिनीच्या नोंदीतील पोकळ नवे रद्द होण्यासाठी केलेल्या अर्जानुसार नावे रद्द केलेल्या फेरफार नोंदीची प्रत आपण मागितली होती. परंतु संबंधित व्यक्तीचा मूळ अर्ज गहाळ केला असून माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी केली.

अन्य व्यक्तींनी केलेल्या अर्जानुसार केलेल्या नोंदी रद्द होण्याबाबतची माहिती श्री.निकम यांनी मागितली होती. संबंधित प्रकरण त्रयस्थ व्यक्तींचे आहे, तसेच मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्यासाठी नियमानुसार आवश्यक प्रक्रिया पार पाडण्याबाबत त्यांना स्पष्ट करण्यात आले होते. नेमक्या माहितीबाबत त्यांना विचारणा केली असतानाही ते न करता व प्रथम अपील न करता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (दंडाधिकारी), उप विभागीय अधिकारी, सातारा यांचे कार्यालय,जि.सातारा श्री.संजय शिंदे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पहाता श्री.निकम यांनी अन्य व्यक्तींच्या जमीन प्रकरणातील व तीही 'पोकळ नावे रद्द करुन फेरफाराचा उतारा द्यावा', अशा स्वरुपाची प्रशासकीय कार्यवाहीचा समावेश असलेली मागणी 'माहिती' म्हणून केली आहे. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (दंडाधिकारी), उप विभागीय अधिकारी, सातारा यांचे कार्यालय,जि.सातारा श्री.संजय शिंदे यांनी त्याबाबत योग्य उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : ३०/१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ,
मु.पो.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ, मु.पो.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

तत्कालीन तहसीलदार श्री.अशोक कांबळे यांची जीप वापराबाबतची सन २००४ ते २००७ या काळातील आपण मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली नाही. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे यांच्यावर दंडात्मक कारवाई व खातेनिहाय चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

श्री.धर्माधिकारी यांना शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीत कळविले होते. त्यांनी शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात आली. कायद्यानुसार माहिती देण्यास असलेली ३० दिवस मुदत संपण्यापूर्वीच श्री.धर्माधिकारी यानी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले होते. विहित मुदतीत आपण कार्यवाही केली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे यांनी केले. अपीलकर्त्याची मागणी नेमकी

नसल्याचे प्रतिपादनही त्यांनी केले. श्री.धर्माधिकारी यांचा मूळ अर्ज पाहता माहितीची मागणी नेमकी नसल्याचे, तसेच त्यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये अवाजवी भाष्य असल्याचे स्पष्ट होते. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि२३.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. उत्तम लक्ष्मण देवकाते — अपीलकर्ता
रा. वाकी (घे) ता. सांगोला, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घे), ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. उत्तम लक्ष्मण देवकाते रा. वाकी (घे) ता. सांगोला, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला जि.सोलापूर श्री. जे. आर. अडसूळ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घे), ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. एस. एस. फासे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामपंचायत, वाकी (घेरडी), ता. सांगोला यांच्याकडील कामासंदर्भात आपण मागितलेली माहिती दोन वर्षे होऊनही मिळाली नाही. टपालाने पाठविलेली माहिती अपूर्ण आहे. अपील क्र.३२६/सोलापूर मध्ये अन्य अपीलकर्ता श्री. अल्लाबक्ष जमादार पाटील यांनी हीच माहिती मागितली होती व ती देण्याचे आदेश आयोगाने दिले होते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. उत्तम लक्ष्मण देवकाते यांनी केले.

अपील क्र.३२६/सोलापूर मध्ये आपण व श्री. हाके या दोघांनीही याच विषयातील माहितीबाबत शास्ती लावण्यात आली आहे. श्री. देवकाते यांना टपालाने पाठविलेली माहिती त्यांनी स्वीकारली नाही. पूर्वीचे ग्रामसेवक श्री. हारीचंद्र सोमा हाके यांनी अपीलकर्त्याला टपालाने परस्पर पाठविलेली माहिती परत आली आहे. असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घे), ता. सांगोला श्री. एम. जी. पवार व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. एस.एस.फासे यांनी केले.

श्री. देवकाते यांना आठ दिवसांत व निःशुल्क माहिती देण्याबाबत आपण आदेश दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी टपालाने पाठविलेली माहिती परत आली असून अपुरी अथवा चुकीची माहिती काय आहे, हे अपीलकर्त्याने आपल्याला कळविलेले नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला श्री. जे.आर.अडसूळ यांनी केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार श्री. देवकाते यांना माहिती समक्ष देऊ केली असता त्यांनी ती घेतली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळीही त्यांनी माहिती घेतली नाही. रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली असता टपाल स्वीकारले नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी (घे), ता. सांगोला श्री. एस.एस.फासे यांनी केले. आपल्याला मुद्देनिहाय माहिती दिली नसल्यामुळे बंद लिफाफा आपण स्वीकारला नाही, असे श्री. देवकाते यांनी सांगितले. तथापि अपीलकर्त्याचे हे स्पष्टीकरण योग्य नाही. टपाल न स्वीकारताच माहिती अपुरी असल्याचे ते म्हणत आहेत. त्यांचे म्हणणे मान्य करता येणार नाही. माहिती स्वीकारून त्याबाबत त्यांनी तक्रार करणे रास्त ठरले असते. श्री. हारीचंद्र सोमा हाके व श्री. एम.जी. पवार यांनी संबंधित कागदपत्रांबाबत वेळीच पूर्तता करून विहित मुदतीत माहिती देणे आवश्यक होते. याच संदर्भात

याच माहितीबाबत त्यांना अन्य अपिलांत शास्ती झाली असून या प्रकरणी कडक समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उदयकुमार रघुनाथ आपटे
बी २/१५, सर्वत्र को.ऑप.सोसायटी, पौड रोड, कोथरूड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उदयकुमार रघुनाथ आपटे
बी २/१५, सर्वत्र को.ऑप.सोसायटी, पौड रोड, कोथरूड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनील देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे श्री.विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सहकारी गृहरचना संस्थेच्या संदर्भातील माहिती मिळत नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.उदयकुमार रघुनाथ आपटे यांनी केली. संस्थेच्या संचालक मंडळासमवेत श्री.आपटे यांनी केलेल्या चर्चेनुसार ती संस्थेकडूनच घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे श्री.विनायक कोकरे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनील देशमुख यांनी केले. संस्थेकडून आपले पैसे येणे असून व्याजाचे नुकसान होत आहे, अशी श्री.आपटे यांची तक्रार असून ते व संस्था यांच्यामधील हा विषय आहे. संबंधित संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे श्री.विनायक कोकरे यांनी दि.२४.११.२००९ च्या पत्रान्वये कळविले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१५.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ,
मु.पो.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छ.ताराराणी विकास आघाडी, शिरोळ, मु.पो.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक नियम व अटींची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांविरूध्द केलेल्या व होणाऱ्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी दिली नाही. जन हितार्थ मागितलेली माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक व अन्य कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

श्री.धर्माधिकारी यांचा अर्ज दि.२२.३.२००७ रोजी प्राप्त झाला व दि.९.४.२००७ रोजी त्यांना माहिती दिली, त्यामुळे विलंब झालेला नाही. पोस्टाचा दाखला घेऊन टपालाने माहिती पाठविली. त्यावर संबंधित पत्राचा जावक क्रमांक नाही, म्हणून आपण माहिती दिली नाही, असे होत नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी याबाबत उल्लेख केल्यानुसार त्याच वेळी पुन्हा एकदा माहिती दिली. विलंब झाल्याची श्री.धर्माधिकारी यांची तक्रार रास्त नाही, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.पी.एस.ढगे यांनी केले.

श्री.धर्माधिकारी यांनी अपील केले तेव्हा तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार जन माहिती अधिकाऱ्यांकडेच असल्यामुळे नवीन तहसीलदार रूजू झाल्यावर अपिलाची सुनावणी घ्यावी, ही अपीलकर्त्याची मागणी मान्य करण्यात आली. चार वेळा त्यांनी मागितल्याप्रमाणे तारखा

देण्यात आल्या व पुन्हा एकदा माहिती समक्ष व निःशुल्क देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.डी.एन.माने यांनी नमूद केले. पूरक कागदपत्रे लक्षात घेता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, जिल्हा परिषद कार्यालयासमोर,
नागाळा पार्क, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, जिल्हा परिषद कार्यालयासमोर,
नागाळा पार्क, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर
श्रीमती. जयश्री भोज

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर, जि.कोल्हापूर
श्री. प्रमोद शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१०.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर यांनी प्रत्यक्षात रू.५० पेक्षा जास्त शुल्क होत नसताना रू.६२० एवढी आकारणी केली. दसपट अतिरिक्त शुल्काची मागणी करून अप्रत्यक्षपणे माहिती नाकारली, म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी केली.

श्री.देसाई यांनी दोन वर्षांमधील विस्तृत माहितीची मागणी केली होती. त्याची पृष्ठसंख्या ३१० होत असून नियमानुसार रू.२ प्रतिपृष्ठ प्रमाणे होणारे शुल्क रू.६२० आकारले. परंतु प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तेवढीच कागदपत्रे नमूद केल्यास त्याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल, असेही त्यांना स्पष्ट करण्यात आले होते, असे जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर यांनी नमूद केले होते. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिपादन मान्य केले. मात्र अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी मुद्दा क्र.१ ते ३ ची माहिती कोष्टक स्वरूपात व मुद्दा क्र.४ ची माहिती कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीच्या स्वरूपात मिळावी, असे सांगितल्यानंतर, त्यांना माहिती निःशुल्क पुरविण्यात आली, असे लेखी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्रीमती जयश्री भोज यानी पूरक कागदपत्रांसह केले.

वरील बाबी लक्षात घेता माहिती नाकारलेली नाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे, असे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जिजारास दादासाहेब पोंदकुळे
मु.पो.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय,ता.इंदापूर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय,ता.इंदापूर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>इंदापूर तहसील कार्यालय,ता.इंदापूर,जि.पुणे श्री.कल्याण पांढरे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.०९.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१०.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.११.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०४.०१.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे भिगवण येथील प्राथमिक शाळेच्या आवारातील अतिक्रमणाबाबत सन १९९८ मध्ये केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती न मिळाल्याच्या कारणांवरुन अपीलकर्ता श्री.जिजाराम दादासाहेब पोंदकुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पोंदकुले यांनी सन १९९८ च्या अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्रांची मागणी केलेली होती. परंतु ती उपलब्ध होत नसल्याचे त्यांना विहीत मुदतीत कळविण्यात आले होते. संबंधित जमीन संकलन अभिलेख विभाग, मंडल अधिकारी, भिगवण, गाव कामगार तलाठी, भिगवण, आदींकडे पत्रव्यवहार करुन ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि ती उपलब्ध होऊ शकली नाहीत. 'ड' वर्गातील कागदपत्रे असल्यामुळे ती नष्ट केली जातात. आपल्याकडे सर्व कागदपत्रे असल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितले होते. त्यांनी ती उपलब्ध करुन दिल्यास त्याची सत्य प्रत करुन देता येईल, असे त्यांना सांगितले होते.परंतु त्यांनी कागदपत्रे दिली नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एच.एस.पाटील यांनी केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. : २४-१२-२००९

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. बाळकृष्ण भगवान दरवडे
६७३, कसबा पेठ, फ्लॅट नं.२०३,
२ रा मजला, सिध्दीविनायक रोड, पुणे-११ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप निबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (३),
सांस्कृतिक भवन, संत तुकारामनगर,
पिंपरी, पुणे -१८ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** रुपी सहकारी गृह रचना संस्था मर्यादित,
पेठ क्रमांक ४, भूखंड क्र.४, प्राधिकरण, मोशी,
ता. हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७२/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२०.०१.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.०१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०४.०८.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.०३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०१.०७.२००८ |
| ७ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी गृहनिर्माण संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती अर्जदारांना देणे बंधनकारक आहे.

त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३) यांनी कार्यवाही करुन त्याचा पूर्तता अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगास सादर करावा.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३१/१२/२००९

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ